# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)
Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/480 दिनांक : 11/04/2025

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक,**
महात्मा गांधी विद्यामंदिर
फार्मसी कॉलेज,
पंचवटी, नाशिक ४२२००३

**विषय: 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्याबाबत......**

संदर्भ: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.2-10/2023 (AC-Policy), दि. २० फेब्रुवारी, २०२५

महोदय,

उपरोक्त विषयास आणि संदर्भीय पत्रांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या **महात्मा गांधी विद्यामंदिर फार्मसी कॉलेज, पंचवटी, नाशिक ४२२००३** या संलग्न महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (ट) आणि कलम १२२ (१) व महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना, दिनांक २२ मे, २०२३ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याबाबतची मानके) २०२३ चा एकरूप परिनियम क्र. ३ मधील तरतूदींच्या, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिसंस्था/नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इ. च्या अधीन राहून, शैक्षणिक वर्ष **२०२५–२०२६ ते २०३४–२०३५** या दहा वर्षे कालावधीसाठी 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्यात येत आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम तसेच या विभागातील परिपत्रकांमधील मार्गदर्शक तत्वे आपणावर बंधनकारक असतील.

पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २ (६१) अनुसार स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची अध्यापक/शिक्षक मान्यता घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त महाविद्यालयाच्या स्वायत्त दर्जाची मुदत संपुष्टात येण्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ३० सप्टेंबर पूर्वी आवश्यकतेनुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरणासंदर्भातील संलग्नताविषयक प्रस्ताव विद्यापीठास विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
प्रभारी–कुलसचिव